# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ३७१/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. वासुदेव राजाराम वझे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (सेवा-४),**
वित्त विभाग, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव**
वित्त विभाग, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २५.०६.२०२६</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १६.०६.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०२०/M/०००१३५ प्रकरणी आयोगाने दि.१७.०८.२०२१ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. १ बाबत सुस्पष्ट उत्तर अपिलार्थींना १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावे. अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशाच्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांनी माहिती मिळालेली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे दि. २९.०९.२०२१ रोजी तक्रार अर्ज दाखल केला. तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाने दि. २१.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (सेवा- ४), वित्त विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून अहवाल मागितला. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (सेवा- ४), वित्त विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून आयोगास दि. १७.१०.२०२२ रोजी अहवाल प्राप्त झालेला आहे.

२. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तथापि, त्यांनी त्यांचे लेखी निवेदन दि.१.०६.२०२६ आयोगास सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले. तक्रारकर्ता यांनी लेखी निवेदनात चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली म्हणून संबंधीतावर शास्तीची कार्यवाही करण्याची मागणी केली.

..२/-

३. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी यापुर्वी आयोगास सादर केलेला अहवाल दि.१७.१०.२०२२ आयोगाच्या निदर्शनास आणून नमुद केले की, श्री. वासुदेव राजाराम वझे यांनी त्यांच्या दि.२१.१०.२०१९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहितीचा अर्ज सादर केला होता. सदर माहितीचा अर्जान्वये मुख्यत्वे खालील मुद्दयाची माहिती मागितली आहे -

उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने वित्त विभागाने म.ना.से. (निवृत्तिवेतन) नियम १९८२ मध्ये दि. ०६.०९.२०१७ च्या अधिसूचने अन्वये जारी केलेले ग्रॅच्युईटी संदर्भातील सुधारणेविषयीचे आदेश विधि व न्याय विभागाच्या कायदेशीर व अधिकृत अभिप्रायानुसार / सल्ल्यानुसार पूर्वलक्षी प्रभावाने लागू आहेत काय हे कळवावे.

उपरोक्त माहितीचा अधिकार अर्जाच्या अनुषंगाने दि. ३१.१०.२०१९ च्या पत्रान्वये दि. ०६.०९.२०१७ च्या अधिसूचनेची प्रत तक्रारकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात आली होती. माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगाने दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने श्री. वझे यांनी दि. १८.११.२०१९ रोजी प्रथम अपिल अर्ज सादर केला होता. सदर अपील अर्जाच्या सुनावणीमध्ये श्री. वझे यांना माहितीच्या अधिकारात मागणी केलेली संबंधित नस्ती त्यांना प्रत्यक्ष पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आली असून त्यांना नस्तीतील आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

श्री. वझे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दि. १३.०१.२०२० रोजी राज्य माहिती आयोगाकडे दुसरा अपिल सादर केला होता. सदर अपिल अर्जावर दि. १२.०८.२०२१ रोजी द्वितीय अपील अर्जाची सुनावणी झाली. सदर सुनावणीअंती राज्य माहिती आयोगाने दि. १७.०८.२०२१ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत :-

१) अंशतः माहिती दिलेली आहे

२) जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. १ बाबत सुस्पष्ट उत्तर अपिलार्थीना १५ दिवसात महितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावे.

३) अपील निकाली काढण्यात येत आहे

राज्य माहिती आयोगाच्या उक्त आदेशास अनुसरुन दि. १६.०९.२०२१ च्या पत्रान्वये श्री. वासुदेव राजाराम वझे यांना कळविण्यात आले होते की, मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने वित्त विभागाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२ मध्ये दि. ०६.०९.२०१७ च्या अधिसूचनेन्वये निर्गमित केलेले ग्रॅच्युईटी संदर्भातील सुधारीत तरतूद विषयीचे आहे. विधि व न्याय विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार तसेच मा. राज्यपाल यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच सदर ग्रॅच्युएटी संदर्भातील सुधारणेविषयी दि. ०६.०९.२०१७ च्या अधिसूचनेन्वये निर्गमित केलेले आदेश हे सदर अधिसूचनेच्या दिनांकापासून भावी प्रभावाने लागू आहेत. तथापि या संदर्भात अधिक स्पष्टतेसाठी विधि व न्याय विभागाने पुनश्च अभिप्राय घेण्यात येत आहेत. या संदर्भात विधि व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात आले असून सदर विभागाने त्यांच्या दि. २१.०४.२०२२ च्या टिप्पणीन्वये असे स्पष्ट केले आहे की, सदर अधिसूचनेमध्ये ती कधीपासून लागू आहे याचा उल्लेख नसल्याने सदर अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून लागू राहील. विधि व न्याय विभागाचे उक्त अभिप्राय श्री. वझे यांना दि.१४.१०.२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहेत.

..३/-

जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.१०.२०२२ रोजीच्या पत्राची प्रत आयोगास सादर केली.

४. जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास नमुद केले की, राज्य माहिती आयोगाने त्यांचे आदेशात १५ दिवसांत तक्रारकर्ता यांना निशुल्क माहिती देण्याचे आदेशित केले होते. परंतु, सदर प्रकरणी पुन्हा विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त करणे आवश्यक असल्याने प्रशासकीय दृष्ट्या विलंब झाला त्याबाबत आयोगासमोर दिलगीरी व्यक्त करुन नमुद केले की, विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर तक्रारकर्ता यांना तसे कळविण्यात आलेले आहे. तसेच त्यादरम्यान कोव्हीडच्या महामारीमुळे कार्यालयामध्ये कर्मचाऱ्यांची उपस्थिती कमी होती. त्यामुळे माहिती देण्यास उशीर झालेला आहे.

५. जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव यांचे लेखी दि.२५.०६.२०२६ आयोगासमोर सादर केले. त्यामध्ये नमुद केले आहे की, सद्यःस्थितीत पावसाळी अधिवेशन सुरु आहे. अधिवेशनातील कामकाजास्तव मी सदर सुनावणीस उपस्थित राहू शकणार नाही. याबाबत क्षमस्व आहे. सदर सुनावणीस श्रीमती निशा मोरे, अवर सचिव व श्रीमती आशा शेट्टी, कक्ष अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

६. या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २९.०६.२०२६**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते